| संक्षीप्त फौजदारी खटला क्रं. ४४०/२०२६ निशाणी क्रं.१ लगत | MHLA120013522026 |
|---|---|

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चा अधिनियम दोन प्रकरण एकविस अन्वये संक्षीप्त संपरिक्षा केलेली ए.एस.गुंजवटे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रं.१ निलंगा, यांचे न्यायालयात**

**नि. क्र.**

१. अपराध घडल्याचा दिनांक – २५/०५/२०२६.

२. अहवालाचा दिनांक – २८/०५/२०२६

३. फिर्यादीचे नांव वय व पत्ता – महाराष्ट्र सरकारतर्फे पोस्टे. शिरुर अनंतपाळ ता.निलंगा, जि.लातूर

४. आरोपीचे नांव वय व पत्ता – वैजनाथ कुंडलिकराव कदम
वय ६० वर्षे, व्यवसायःवाहनचालक
रा.नळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर

५. आरोपीला समजावून सांगणेचा – भारतीय न्याय संहिता कलम २८५ प्रमाणे.

६. **तपशिल :–**

तुम्ही दिनांक २५.०५.२०२६ रोजी १८.०० वाजणेचे सुमारास मौजे तळेगाव देवणी येथील तळेगाव देवणी ते शिरुर अनंतपाळ जाणारे रोडवर मध्यभागी आरोपीने त्यांचे ताब्यातील टाटा मॅजिक क्र.MH-24-E-9405 रस्त्यावर उभा करुन येणारे जाणारे वाहनास अडथळा करुन, स्वतःचे, प्रवाशांचे व ईतराचे जिवीतास धोका होईल अशा स्थितील वाहन उभी केलेला मिळून आला म्हणून सदर आरोपीस भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८५ प्रमाणे अपराध केलेला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे. आरोपीला आरोप वाचून दाखविणेत आला व समजाविणेत आला.

७. **आरोपीचे प्रतिकथन**

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर होय.

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय ?

उत्तर होय.

प्र. ३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर होय, मला गुन्हा कबूल आहे.

दिनांक २९.०५.२०२६ समोर,

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.05.29 18:00:56 +0530

....................

आरोपीची सही (**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,(न्यायालय क्र.१) निलंगा

आरोपीने सदरचा गुन्हा कबूल केलेला आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. तरी कमीत कमी शिक्षा व्हावी अशी विनंती केली. गुन्हयाचे स्वरुप पाहता खालील प्रमाणे आदेशित केलेली शिक्षा न्यायसंगत दिसून येते.

**<u>आदेश</u>**

आरोपी वैजनाथ कुंडलिकराव कदम याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८५ प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येते असून त्याला भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८५ या गुन्हयाकरीता **रक्कम रुपये १०००/-(रुपये एक हजार फक्त) दंडाची** शिक्षा सुनावणेत येत आहे. वरील एकूण **दंडाची रक्कम न भरल्यास ४ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा** सुनावणेत येत आहे.

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.05.29 18:01:02 +0530

दि.२९/०५/२०२६. (**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.१) निलंगा